# Got 1st prize @PMC SWATCHA CHALLENGE AWARD



CITY Update

५ मंगळवार 10•01•2023 BREAKING NEWS AND MORE

www.rashtrasanchar.com @rashtrasanchar

» Selected

राष्ट्रसंचार छायाचित्र सेवा

## स्वच्छ टेक्नॉलॉजी चॅलेंज स्पर्धेत अनंतराव पवार अभियांत्रिकी महाविद्यालयास प्रथम क्रमांक

**पुणे :** पुणे महानगरपालिका व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ टेक्नॉलॉजी चॅलेंज २०२२ ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड रिसर्च, पर्वती, पुणे महाविद्यालयाच्या द्वितीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरींग विभागातील अनुज कुलकर्णी, वरुण कुलकर्णी व माजी विद्यार्थी निशांत पुजारी या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला. घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिक निर्मूलन, सांडपाणी नियोजन अशा सामाजिक प्रश्नांवर नावीन्यपूर्ण उपाय शोधण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले होते. शहरातील स्वच्छता, व्यवस्थापनामध्ये लोकसहभाग वाढवण्याच्या उद्देशाने सदर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. लोकसहभाग, कचरा व्यवस्थापन, प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन आणि पारदर्शकता हे चार मुद्दे केंद्रस्थानी ठेवून प्रकल्पांची मांडणी तयार करावयाची होती. या स्पर्धेमध्ये "सुक्या कचऱ्यापासून पर्यावरणपूरक इंधन" या संकल्पनेवर सदर विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. सादर केलेल्या प्रकल्पामुळे वायूप्रदूषण, हॉटेल्स, ढाबा व खानावळींना कमी खर्चामध्ये नवीन ऊर्जा स्त्रोत उपलब्ध होईल. तसेच माणसाच्या अंत्यविधी क्रियेत मोठ्या प्रमाणात लाकडांचा वापर केला जातो. या नावीन्यपूर्ण संशोधनामुळे अंत्यविधी क्रियेत वापर होणाऱ्या वृक्षतोडीस आळा बसेल व पर्यावरणाचे संवर्धन होण्यास मोठी मदत होईल, असे मत स्पर्धकांनी नोंदविले. या पुरस्काराचे वितरण मा. चंद्रकांत पाटील उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य व महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांचे हस्ते व आशा राऊत, उपायुक्त घनकचरा विभाग पुणे मनपा, अपूर्वा पालकर, कुलगुरू महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि सुप्रसिद्ध संगीतकार सलील कुलकर्णी यांच्या उपस्थित करण्यात आले. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे, मेकॅनिकल इंजिनिअरींगचे विभागप्रमुख प्रा.गणेश कोंढाळकर, सर्व विभागप्रमुख व प्राध्यापकांचे अभिनंदन केले.



# PMC SWATCHA CHALLENGE AWARD





# RECEIVED 2ND PRICE IN SWACHA TECHNOLOGY CHALLEGE BY PMC





## स्वच्छ टेक्नॉलॉजी चॅलेंज स्पर्धेला प्रतिसाद

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ५ -** मनपा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ टेक्नॉलॉजी चॅलेंज ही स्टार्टअप स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनियरिंगच्या एन्व्हायर्नमेंटल इंजिनिअरिंगची माजी विद्यार्थिनी अक्षदा निवृत्ती गोगावले हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. घनकचरा व्यवस्थापन, प्लॅस्टिक निर्मूलन, सांडपाणी नियोजन अशा सामाजिक प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले होते. लोकसहभाग, शून्य कचरा व्यवस्थापन, प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन आणि पारदर्शकता यावर प्रकल्पांची मांडणी करावयाची होती. पुरस्काराचे वितरण उपमहापौर सुनीता वाडेकर व महापालिका आयुक्त विक्रम कुमार आणि विद्यापीठाच्या इनोव्हेशनच्या संचालक अपूर्वा पालकर यांच्या हस्ते करण्यात आले. अक्षदाला प्रा.सागर गावंडे यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे, सर्व विभाग प्रमुखांनी अक्षदा हिचे कौतुक केले आहे.

प्रभात Sun, 06 February 2022
https://epaper.eprabhat.net/c/6